# जन्म पुन्हा

**www.saarthbodh.com**

बोलते कळकळीने
ऐक देवा शेवटीचे
पहा उघड्या डोळ्याने
हाल या बापुडीचे ॥१॥

सोडिलेस तुझ्यापासुनी
धाडिलेस माय गर्भी
मनी शंका भार कोवळा
तोल त्यांचा वाम मार्गी ॥२॥

खास ओळख नव्हती
तोवरी काळजी माझी
कळली स्त्री जात मात्र
नुरली धडगत माझी ॥३॥

किती टाकिल्या रानीवनी
किती फेकील्या गटारी
काही मासपूर्वी गेले
मी आले परत फिरुनी ॥४॥

हा आत्मा संजीवन
निराकार ओळख जाण
नको स्त्री वा पुरुष जन्म
ते लोक सारे विचारहीन ॥५॥

राहू दे बा पायी तुझ्या
नको आता जन्म पुन्हा
जन्मदाते टाकिले जर
ते सोसणार नाही पुन्हा ॥६॥

© सचिन पु. कुलकर्णी

www.saarthbodh.com FB ID - sachin.kulkarni78